गुणप्रधानं हीन कोटींतील खराट्यासारख्या व बाभळीसारख्या वस्तू आपण होऊन, संत चक्रवर्ती बाबांच्या पायावर लोटांगण घालण्याकरतां चारी दिशांकडून येणाऱ्या साधुसंतांच्या चारी वाटा झाडण्याचें काम करण्याच्या, व साधुसंतांचे समाधिवर, थडग्यावर अगर खड्यावर लावलेली बाभूळ आपण होऊन, जाणाऱ्या येणाऱ्या संतप्रेमी वाटसरू सद्भक्ताकडून, त्या बाभळीवर फेंकले जाणारे तांदूळ आपण त्या समाधिवर, थडग्यावर किंवा खड्यावर फेंकून साधुसंतांची व बाबांची सेवा करण्याच्या कल्पना खरो-खरच उदात्ततम होत असें मला वाटतें.

या श्रीम्हाळसादेवींच्या व शिरडीतील इतर बायांच्या बाबांवरील कवनासंबंधी श्री. कै. भक्तश्रेष्ठ आण्णासाहेब दाभोळकर लिहितातः—

"काय त्या बायांचा प्रेमा तरी। काय तयांचे प्रेमाची माधुरी॥ निर्मळ प्रेमचि कवन करी। विद्वत्ता न करी कवनास॥ ७८॥ साधी सरळ भाषा खरी। विद्या नाहीं तिळभरी॥ त्यांतून जें कवित्व चमक मारी। मान चतुरीं डोलविजें॥ ७९॥ खऱ्या प्रेमाचें आविर्भवन तया नांव खरें कवन॥ तें या बायांच्या वाणीमधून॥ श्रोतीं पाहून घ्यावें कीं॥ ८०॥ धन्य धन्य तयांची प्रेमळता। खळ्यांत परसांत कामें करतां॥ दळतां कांडतां डेरे घुसळतां॥ महिमा गातांत बाबांचा॥ ७६॥ आसनीं भोजनीं, शयनीं। बाबांच्या नांवाची अक्षय्य स्मरणी॥ एका बाबावीण दुजा कोणी। देव ज्यांनीं नाठवीला॥ ७७॥

श्रीसाईसच्चरित अ. १० वा.

श्रीक्षेत्र शैलधी शिरडी.
आश्वीन कृ. ६ गुरुवार
दिनांक २–११–३९

बाबांचें बाळ

—:०:—

श्रीदत्त चित्साइ सद्गुरुभ्योनम:

## श्री समर्थ सद्गुरु साईबाबा महाराज संस्थान शिरडी (शैलधी) येथील शके १८५८-५९-६० या त्रैवार्षिक संवत्सरांत घडलेल्या गोष्टीचें स्थूलदृष्टया संकलित

# वृत्तांतकथन

## ३ आरोग्य, सोयी व रस्ते

१. शिरडी गांवांतील ग्रामपंचायतींनीं गांवांत कोपरगांव संगमनेर या रहदारीच्या मोठ्या रस्त्यापासून, बाबांच्या समाधिमंदिरावरून श्री साईनाथ लक्ष्मी दामोदर बाबरे चिंचणकर वाचनालयापर्यंत एक लहानसाच पण रुंद प्रशस्त व उठावदार रस्ता केला आहे. तो रस्ता व गांवांतील इतर बारीक सारीक रस्ते साफसूफ ठेवण्याकरतां व संस्थानने बांधलेले शौचकूप स्वच्छ राखण्यांकरतां भंगी व महार यांची व्यवस्था केली आहे. हें काम सार्वजनिक अल्यामुळें संस्थानकमिटीनींही त्यास मदत म्हणून दरमहा रु. २ दोन देण्याचें मंजूर केलें आहे.

### शौचकूप.

२. उत्सवांत बाहेर गांवाहून येणाऱ्या सद्भक्तांच्या सोईकरतां संस्थान कमिटीनें प्रथम दोन शौचकूप बाबांच्या बागेच्या आवारांत बांधले. पण ते अपुरे पडूं लागल्यामुळें या त्रैवार्षिक कालांत आणखी तीन नवीन शौचकूप बांधले आहेत. त्यामुळें उघड्यावर शौचास बसण्याची संवय नसलेल्या नगर निवासी व यात्रेकरतां येणाऱ्या भक्तांची चांगली सोय झाली आहे. हे ही शौचकूप त्याच बागेच्या आवारांत पहिल्या दोन शौचकूपाचे शेजारी बांधून तिकडे जाण्याकरतां एक चिमुकला रस्ताही केला आहे.

### पाणी व धर्मशाळा.

३. स्वतंत्ररीत्या पाणी भरण्याची, स्नान करण्याची, कपडे धुण्याची, व वाळत टाकण्याची, व त्याकरतां एक लहानसें पण प्रशस्त पत्र्याचें घर अथवा धर्मशाळा बांधण्याची अद्याप सोय झाली नाहीं. पण यथावसर बाबांच्या बागेस लागून पण आवाराबाहेर असलेल्या लोकल बोर्डाचे विहिरीजवळ ही सोय करण्याचा संस्थान कमिटीचा

विचार आहे. जागा व द्रव्य यांच्या अभावामुळें वरील सोयी लांबणीवर पडल्या आहेत.

## रस्त्यावर दिवे. (वीथि स्तंभदीप)

४. आजपर्यंत अंधेऱ्यारात्रीं रस्त्यावर दीपप्रकाशाची कांहींच सोय नव्हती. या त्रैवार्षिक अवधींत निदान काळोख्या रात्रीं रस्त्यावर पेट्रोमॅक्सचे दोन मोठे दीप लावण्याची संस्थान कमिटीनें सोय केली आहे. त्याचा उजेड फक्त बाबांच्या चावडी-पासून बाबांच्या समाधि मंदिरापर्यंत एकाच बाजूनें पडतो. तसेंच आणखी मोठे दोन दीप, एक वाचनालयाच्या सन्निध असलेल्या श्रीरामपद सेवक श्रीहनुमानजीच्या मंदिरा जवळ, व दुसरा कै. भक्तवर्य काकासाहेब दीक्षित यांच्या वाड्याचे कोपऱ्यांवर, असे दोन दीप लावले म्हणजे त्या चारी दीपांचा प्रकाश एका बाजूनें थेट मोठ्या सडके-पासून, बाबांच्या बागेवरून, वरील श्री बलभीमजीच्या मंदिरापर्यंत, दुसरे बाजूनें थेट बाबांच्या चावडीपासून श्री द्वारकामाईवरून व बाबांच्या समाधिमंदिरावरून मोठ्या रस्त्यापर्यंत पडेल. बहुतकरून ही सोय शके १८६१ सालांत कमिटी करणार आहे.

## ४ संस्था व दुरुस्त्या

### सभामंडप.

१. बाबांच्या समाधि मंदिरापुढील जागा सद्भक्त श्री दामुआण्णा रासने नगरकर यांनीं सभामंडपाकरतां विकत घेऊन संस्थानास बक्षिस दिली. पण मंदिराच्या मानानें ही जागा फारच अपुरी पडे. करितां या त्रैवार्षिक कालांत त्याच जागेस लागून असलेली श्री गोंदकर यांची जागा संस्थान कमिटीनें चिंचणकर मिळक-तीच्या उत्पन्नाच्या रकमेंतून पैसे खर्च करून (रु. ९६०) विकत घेतली. तसेंच त्याच जागेस लागून असलेली श्री पुनमचंद शेट मारवाडी यांची जागा रावसाहेब श्री यशवंत जनार्दन घाळवणकर सुपरिंटेंडंट पोलीसखातें मुंबई सेक्रेटरीएट रा. अनोळे हल्लीं वस्ती वांद्रें यांनीं, विकत घेऊन (एकंदर खर्च ७५० रु) संस्थानास बक्षिस दिली. यामुळें समाधि मंदिरापासून श्री द्वारकामाईपर्यंत सभामंडपाकरतां २–३ हजार मंडळी बसतील एवढें भव्य व विशाल पटांगण तयार झालें आहे. संस्थान कमिटीनें ही जागा साफसूफ करून, उंच सखोलपणा काढून टाकून, दोन बाजूस अवार भिंती घातल्या आहेत. आतां सभामंडप बांधण्याचें कार्य केव्हां होईल तें बाबांना माहीत.

याच जागेंत, संस्थान कमिटीनें श्री नंदुराम मारवाडी यांच्या घरासमोरील सरकारी जागेचा लहानसा तुकडा विकत घेऊन, सामील केला आहे.

## स्वयंपाकघर.

२. सभामंडपांत एका बाजूस बांधलेल्या स्वयंपाकघराची शिल्लक राहिलेली परिपूर्ति चिंचणकर मिळकतीच्या उत्पन्नांतून रु. २३२ खर्च करून अपुरे राहिलेले दरवाजे, खिडक्या, जाळ्या तयार करून व भिंती घालून वर पत्रे ठोकून केली आहे.

## बाबांचा बाग.

३. वैराग्यशील यती, व्रती, तपी, योगी वगैरे बाबांच्या अनन्य भक्ति मुमुक्ष-वृंदाकरतां, बाबांची बाग एकांतवसाचें स्पृहणीय व विलोभनीय तपोवन करण्याचा सस्थान कमिटीचा शुद्ध, पुण्य, पवित्र विचार आहे. या कामास अवश्य लागणाऱ्या साधनापैकीं फक्त एक दोन साधनांचीच जुळवाजुळव झाली आहे. पण ती प्रयोगावस्थेंतच आहे. जसा जसा द्रव्याचा पुरवठा व मुमुक्षु भक्तांची सहानुभूति व प्रोत्साहन मिळत जाईल, तसतशी बाकीच्या साधनांची जुळवाजुळव मंद किंवा शीघ्र गतीनें करण्यांत येईल.

या त्रैवार्षिक कालांत बागेस रु. १७५ खर्च करून कांटेरी तारेचें सुंदर व मजबूत आवार केलें आहे.

## बाबांची चावडी.

४. (शयन मंदीर) इतकी नादुरुस्त झाली होती. कीं तिची मागील बाजू सबंध पडून दुसऱ्या एका बाजूचीही भिंत कोसळली होती. त्यामुळें गुरुरायांचें शयन स्थान खर सूकरादि प्राण्यांनीं आपले निद्रागार व शौचकूप बनविलें होतें. हें हृदय-द्रावक दृश्य संस्थान कमिटीच्या बहुतेक सर्व सभासदांनीं डोळ्यानें पाहून चावडी ताबड-तोब पाडून नवीन बांधण्याचा ठराव केला. त्याप्रमाणें चावडी चिंचणकर मिळकतीच्या उत्पन्नातून अजमासे २००० रु. खर्च करून नवी बांधली. व तिला **"श्री साईनाथ लक्ष्मी दामोदर बाबरे चिंचणकर चावडी"** असें सर्वानुमतें नांव दिलें. या चावडींत बाबांच्या शयनस्थानाजवळ एक नंदादीप ठेविला आहे. व गुरुवारच्या चावडी समारंभाचे वेळीं बाबांची छबि ठेवण्याकरतां चुना सिमिटाचें पक्के लहानसें सिंहासन केलें आहे.

## वाचनालय.

५. या त्रैवार्षिक कालांत जसें वरील चावडीचें काम झालें तसेंच त्याच इमारतीतील एका खोलींत **"श्री साईनाथ लक्ष्मी दामोदर बाबरे चिंचणकर वाचनालय"** या नांवाची संस्था काढली आहे. हें वाचनालय शके १८५९ च्या विजयादशमीच्या सुमुहुर्तावर मोठ्या समारंभानें उघडण्यांत आलें. त्यांत हल्लीं तूर्त दैनिक ज्ञान-

प्रकाश हें एकच पत्र घेण्यांत येतें. श्री साईलीला व इतर दोन तीन नियतकालिकें ही घेतात. 'श्रीमन्महाभारत' भागवत रामायणादि पुराण विद्वन्मान्य ग्रंथ व इतर सद्बुद्धि प्रेरक व सन्मार्गदर्शक अशीं वाचनीय पुस्तकें सुमारें २०० ठेविलीं आहेत. वरील सर्व ग्रंथ व पुस्तकें भक्तजनांनीं देणगी म्हणून दिली आहेत. संस्थान कमिटी या सर्व सद्भक्तदात्यांची आभारी आहे.

हें वाचनालय विशेषेंकरून मराठी शाळेंतील ५–६ व ७ इयत्ता शिकणाऱ्या होतकरू विद्यार्थ्यांकरतां उघडलें आहे. गांवांतील कांहीं थोडी श्री रामचंद्र दादा कोते पाटलासारखीं वाचनप्रेमी मंडळी या संस्थेचा नियमितपणें लाभ घेतात.

वाचण्याकरतां तूर्त एकच तास ठेविला आहे. मराठी शाळेचे मुख्याध्यापक व शिरडी संस्थानचे गवई श्री. मराठे हे या वाचनालयाची सर्व व्यवस्था पाहतात.

गावांतील रस्ते, व रस्त्यावरील दिवे हीं कामें जशी सार्वजनिक उपयोगाची आहेत तसेंच वाचनालय हें ही सार्वजनिक उपयोगाचें आहे. या अशा सार्वजनिक कामास ग्रामजनांची व अधिकारी वर्गाची सदैव सहानुभूती, अनुकूल दृष्टि व प्रोत्साहन पाहिजे. तरच ह्या संस्था चिरकाल टिकतात.

## वर्ग व शिष्यवृत्त्या.

६. जनतेकडून व अधिकारी वर्गाकडून जसजसी सहानुभूती व प्रोत्साहन मिळत जाईल, तसतसें क्रमक्रमानें व यथावसर गायन, वादन, कीर्तन, भजन व इंग्रजी ३ रे इयत्ते पर्यंत शिक्षणाचा वर्ग काढण्याचा संस्थान कमीटीचा विचार आहे. वर्ग काढण्यापूर्वीही दोन तीन मुलांना तबला वाजविण्याचें व गाण्याचें शिक्षण संस्थान गवई देत असत. त्या शिक्षणाचा अगदी अडल्या वेळीं उपयोग होतो. पण विद्यार्थ्यांच्या जीवनाला व संस्थानच्या जरूरीच्या व नेहमीच्या कार्याला त्याचा जसा उपयोग व्हावा तसा होत नाहीं.

ह्या वर्गांतील विद्यार्थ्यांना व शाळेंतील इतर हुषार व मागासलेल्या जातींच्या मुलांना उत्तेजन म्हणून बाबांच्या नांवच्या कांहीं शिष्यवृत्त्याही ठेवण्याचा संस्थान कमीटीचा विचार आहे. बाबांना मुलांची व गाण्याची फार आवड असे. करितां अशा प्रकारचें वर्ग व शिष्यवृत्त्या हें एक बाबांचे ल्हानसें स्मारकच होईल. पण ह्या सर्व गोष्टी जनतेच्या व अधिकारी वर्गाचा सहानुभूतिवर व प्रोत्साहनावर अवलंबून आहेत.

## ६ संस्थान स्थावर जंगम मिळकती.

## शिरडी येथील स्थावर मिळकती.

१. संस्थानच्या मालकीच्या व मालकीच्या नसून फक्त ताब्यांत असलेल्या शके १८६० अखेर पर्यंत शिरडी येथें एकंदर ल्हान मोठ्या मिळून स्थावर मिळकती १७

आहेत. त्यांची स्वतंत्र यादी ( रजिस्टर ) व नकाशा तयार करून ठेविला आहे. यादी लवकरच छापून प्रसिद्ध करण्यांत येईल.

१. अ. नेवाळे, चिंचणी व वेढे येथील बाबरे मिळकती.

ह्या मिळकतींबद्दल सविस्तर हकीकत श्री साईलीलेंत वेळोवेळी आलीच आहे. सदर मिळकत शके १८५७ अखेर पूर्ण कर्ज मुक्त झाली आहे. त्या साल अखेर सदर मेळकतीचे विश्वस्ताजवळ रु. ३२२८-१०-९ शिल्लक होती. या शिल्लकेंत शके १८५८ व १८५९ सालचे उत्पन्नाची भर पडून त्या रकमेचा खर्च किती व कसा झाला याबद्दलची सांयंत हकीकत श्री साईलीला वर्ष १४ जोड अंक ९–१० यांत सविस्तर दिली आहे.

२. याच त्रैवार्षिक कालांत सभामंडपाकरतां जशा दोन जास्त जागा मिळाल्या तशीच श्री द्वारकामाईस लागून असलेली श्री तात्याबा गणपत पाटील कोते यांची १०० रु. किमतीची बखळ जागा त्यांनीं संस्थानास बक्षिस म्हणून दिली.

३. त्याचप्रमाणें बाबांच्या बागेस व लेंडी नाल्यास लागून असलेला जमिनीचा लहानसा तुकडा किंमत अजमासे रु. ५० चा श्री नामदेव गणाजी कोते रा. शिरडी यानीं संस्थानास बक्षिस दिला आहे.

४. श्री द्वारकामाईचे इमारतीची दुरुस्ती, मुंबई नगरींत राहणारे व हल्ली उद्योग धंदा मुंबईत बोटीवर करीत असलेले बाबांचे पारशी शेट भक्त श्री जहांगिरजी फ्रामजी मिनू मॅनशन ३ रा मजला, मुंबई १२ यांनीं ९१५ रुपये खर्च करून केली आहे. हें दुरुस्तीचें काम शिरडी इरिगेशन भागांचे काम कॉंट्रॅक्टनें करणारे ओव्हरसीअर श्री. माधवराव विष्णु सहस्रबुद्धे यांनीं केलें आहे. काम सुंदर व प्रशस्त झालें आहे. पैसे श्री सगुणा मेरू नाईक बाबांचे शिरडीतील जुने भक्त यांचेकडे आले होते काम परभारें झालें. शिरडी संस्थान कमिटीकडून झालेलें नाहीं.

५. श्रीद्वारकामाईंत बाबांच्या देव्हाऱ्याचे बैठकी करतां एक चुना सिमिटाचें नवें सिंहासन याच कालांत तयार केलें आहे. तसेंच बाबांच्या धुनी जवळील बरीचशी जागा धुनीच्या आगीमुळे भुसभुशीत होऊन एखादेवेळीं अपघात होण्याचा संभव होता. पण ही गोष्ट वेळींच श्री. र. भा. दादा पुरंदरे व श्री. माधवराव सहस्रबुद्धे यांचे लक्षांत आल्यामुळे त्यांनीं त्या जागेची योग्य दुरुस्ती करून धुनी जवळील लाकडी कठडा काढून टाकून तेथे लहान उंचीची पक्की भिंतच बांधून घेतली. त्याचप्रमाणें रथाच्या खोलीच्या बाजूकडील द्वारका माईची भिंत ही जरूर तितकी दुरुस्त करून घेतली. तेथें आणखी ही बारीक सारीक दुरुस्त्या केल्या.

६. त्याचप्रमाणें वरील श्री. पुरंदरे दादांनीं व श्री. माधवराव यांनीं बाबांच्या समाधि मंदिरांतील समाधिवरील पायाखाली जाणाऱ्या पाण्याकरतां प्रदक्षिणेचे वाटेवर

खाली फरशीस गटार खोदून तें सर्व पाणी बाहेर काढून मागील प्रदक्षिणेचे वाटे खाली सिमिट चुन्याचें दोन लहान हौद तयार करून, त्यांत सोडलें आहे.

तसेंच प्रदक्षिणेचे मागील बाजूस लोखंडी कांबींचा भजबूत कठडा केला आहे.

त्याचप्रमाणें पाणी तापविण्याचे जागेस सुंदर दगडी फरशी करून स्नानघरांत बसण्याकरता चुना सिमिटाची बैठक तयार करून घेतली आहे.

हीं वरील सर्व कामें फक्त ४० रुपयांत करण्यांत आलीं आहेत.

## जंगम

७. सर्व जंगम वस्तूंची यादी किमती सुद्धां ( व भांड्याच्या वजनासुद्धां) तयार करून ठेविली आहे. ती लवकरच छापून प्रसिद्ध करण्यांत येईल.

८. बाबांची मोरचेलें व पालखीचे आंतील व बाहेरील पडदें, झालरी, गोंड्यासह श्री पुरंदरे दादांनी मुंबईहून उत्तम प्रकारें दुरुस्त करून आणिलीं. खर्च अनुक्रमें अजमासें रु. १०९ व ८५ झाला.

९. नादुरुस्त झालेली भांडीं मोडीस देऊन त्या पैशांतून नवी भांडीं खरीदी करण्यांत येतात. तसेंच नादुरस्त व जास्त झालेल्या बाबांच्या कपड्यांचा प्रत्येक उत्सवांत लिलाव करण्यांत येतो. भक्तजन ते कपडे प्रसाद समजून जास्त किंमत देऊन आनंदानें विकत घेतात.

## ८ संस्थान कारभार कार्यक्रम व घडामोडी.

१. या त्रैवार्षिक अवधींत शिरडी संस्थानच्या पूर्वीच्या जुन्या सचिवांचे जागीं नवे सेवानिवृत्त प्रशस्य सचिव श्री. श्रीधर नारायण खारकर ठाणें यांची व पूर्वीच्या जुन्या कोषाध्यक्षाचे जागीं श्री. रामचंद्र रामकृष्ण सामंत वांद्रें यांची संस्थान कमिटीनें नेमणूक केली. व त्याचप्रमाणें ते आपापली कामें करीत आहेत. याच अवधींत श्री क्षेत्र शैलधी ( शिरडी ) येथें मोठ्या सभेच्या एकंदर १० बैठका झाल्या.

२. लहान ( सबकमिटी ) कमिटी कांहीं कारणानें बंद केली.

३. या त्रैवार्षिक कालांतील सर्व उत्सव नेहमीप्रमाणें बाबांच्या कृपेनें पार पडले.

४. श्री. महादु कान्हु फसले घोडेवाला याचा पगार कांहीं कारणानें १२ चा १० केला होता. तो त्यास पुन्हां रु. १२ देण्याचा ठराव केला. तसेंच श्री. रंगनाथ बाळा गुरव यांस ९ रु. पगार होता तो त्याला रु. १२ देण्याचा ठराव केला.

५. सर्व भाडेकऱ्यांकडून भाडेकरार लिहून घेतले आहेत.

६. श्री संत भाऊराव कुंभार हे श्री साइचरणीं लीन झाले त्यांची व त्यांच्या समाधीची हकीकत पूर्वीच श्री साईलीलेंत आली आहे. त्यांच्या समाधीचे सर्व काम श्री गुण मेरू नाईक यांचे मार्फत झालें. संस्थानशी त्याचा कांहीं संबंध नाही.

७. शके १८६० साल्चा अढावा तयार होऊन अद्याप माझे हातीं आला नाहीं. त्यामुळें संस्थानच्या सांपत्तिक स्थितींत काय काय फेरफार झाले ते नेहमीच्या तौलनिक पद्धतीनें दाखवितां येत नाहींत. तथापि या त्रैवार्षिक कालांत श्री रा. रा. सामंत प्रशस्थ कोषाध्यक्ष यांचे कारकीर्दींत संस्थान द्रव्यनिधींत भरच पडली आहे. शके १८५७ च्या अखेर संस्थान निधी, खर्च वेंच जाऊन रु. ५१४०० होता. तो शके १८६० चे फाल्गुन अखेर रु. ५५९०० झाला. म्हणजे मूळ ५१४०० निधींत रु. ४५०० ची भर पडली व रु. १८३५ ऐवजी रु. २००० व्याज येऊं लागलें. म्हणजे संस्थानची सांपत्तिक स्थिती कोणत्याही प्रकारें दैन्यावस्थेंत नाहीं. उलट उन्नतावस्थेंतच आहे. आतां हा निधी असाच स्टॉक करीत बसण्यापेक्षां यातून कांहीं पैसे काढून अत्यंत जरूरीच्या पाण्याच्या व धर्मशाळेच्या सोयी संस्थान कमीटी लवकरच करील अशी बळकट उमेद आहे.

## ८ इंग्रजी भाग

१. या त्रैवार्षिक काळांत, वानप्रस्थाश्रमी विद्वान बी. ए. बी. एल्. मद्रास कायदे मंडळाचे सेवानिवृत्त सभासद वकील श्री बी. व्ही. नरसिंह स्वामी यांनीं कांहीं काल शिरडीस व महाराष्ट्रांतील इतर ठिकाणीं मुक्काम करून बाबांच्याच कृपेनें व प्रेरणेनें बाबांसंबंधी माहिती घेऊन मद्रास इलाख्यांत संडे टाइम्स व अशाच दुसऱ्या पत्राद्वारें, नूतन निर्मित संस्थाद्वारें श्री. रावसाहेब पपैयाचेटी यांच्या साहाय्यद्वारे, दोनतीन इंग्रजी पुस्तक लेखन द्वारें व स्वतः दौरा काढून व्याख्यान द्वारें शिरडी संस्थान प्रचार कार्य मोठ्या धडाडीनें, निरपेक्ष बुद्धीनें व हौसेनें चालविलें आहे. इकडील शिरडी संस्थान कमीटी काय काम करतें हें सर्व जनांस विदित होण्यास फक्त श्री. साइलीला मासिक हें एकच साधन आहे. पण तें मराठी व अनियमित असल्या कारणानें मद्रास कडील बाबांच्या भक्तांस व इतर मुमुक्षु जनतेस त्या मासिकाचा कांहीं उपयोग होत नाहीं. श्री नरसिंह स्वामींच्या प्रचार कार्यामुळें तिकडील पुष्कळ लोकांत बाबांबद्दल प्रेम व भक्ती उत्पन्न झाली आहे. पुष्कळ मंडळी शिरडीस समाधि दर्शनाकरतां येऊं लागली आहेत. कित्येक तिकडून अभिषेका करता व निधीकरतां पैशाच्या मनी आर्डरी करून उदी व प्रसाद मागवीत आहेत. याप्रमाणें काम चालल्यास एक लाख द्रव्यनिधी होण्यास व सभा मंडपासारखीं कामें होण्यास वेळ लागणार नाहीं.

व येवढ्याच करतां हल्लीं श्रीसाइलीलेंत एक इंग्रजी भाग ठेवण्यांची व्यवस्था होत आहे.

बाबांचे बाळ

११२

# शिर्डी-वृत्त

## माहे जानेवारी सन १९४०

### देणग्या

श्री. ए. एस. गोपाळकृष्ण अय्यर त्रिचनापल्ली यानी आरबी भाषेतील ८ पुस्तकें, रा. सा. पापैया चेट्टी मद्रास यांनीं आरबी भाषेंतील दहा पुस्तकें, श्री. रामस्वामी चेट्टी शिमोगा यांनी कानडी पुस्तकें २५ व श्री. सुब्रम्हणी अय्यर, डींडीगल, यानी आरबी भाषेंतील वीस अशी पुस्तकें अर्पण केली. त्याच प्रमाणें श्री. बी. व्ही. एन. स्वामी यांनीं आतां पर्यंत दक्षिण हिंदुस्थानांत बाबा भक्ती प्रचार करून बाबांचेविषयीं त्यानीं स्वतः लिहिलेल्या इंग्रजी व त्याचेच अनुवादरूपी त्या भागांतील भक्तवर्यांकडून तयार झालेले पुस्तक रूपी वाङ्मयाचा एक मोठा साठा पूर्ण विक्री झालेस आजमासे रु. १००० उत्पन्न होईल असा संस्थानास देणगी दाखल संस्थान कमिटीचे हवाली करून शिरडी वाचनालयास देणगी म्हणून इंग्रजी, संस्कृत, मराठी व हिंदी अशींच १०३ पुस्तकें अर्पण केली आहेत.

### धर्मकृत्यें

श्री. बी. व्ही. नरसिंहस्वामीजी यानी ४ विष्णूअर्चनें आपले देखरेखीखाली केली. दोन श्री. रा. सा. पापैया चेट्टी मद्रास यांची व एक श्री. ननजुंडिया मधुगिरी यांचे व एक श्री. पी. बी. रामैया मद्रास यांचे. श्री. रंगनाथ त्रिचनापल्ली यांनी श्रीस नैवेद्य ब्राह्मण सुवासिनी भोजन दिलें. श्री. जि. चेलवा पिलाई अभिषेक. श्री. रंगनाथ त्रिचनापल्ली अभिषेक. श्री. पार्वती अम्मल अभिषेक. श्री. टी. एन. पिरूमल्ल अभिषेक. श्री. श्रीपती त्रिंबकराव मद्रास अभिषेक. श्री. टी. सुब्रामैया मद्रास अभिषेक. श्री. डी. डी. श्रीनिवासराव कमलपुरम् अभिषेक. श्री. टी. ए. पिलाई मद्रास अभिषेक. श्री. एस. बी. केशवअय्या अभिषेक. श्री. कुपुस्वामी मुदलीयार तहसिलदार इम्रोड, तीन अभिषेक केलें. श्री. व्ही. नटेश नायकर मदनपाले अभिषेक. श्री. टी. डोरास्वामी पिल्लाई अभि-

षेक श्री. एस. मनू स्वामी नंद्यळ ( करनूर ), श्री. एन. कृष्णराव चितळदुर्ग अभिषेक. श्री. एन. सुविया इरोड. अभिषेक. श्री. एन. सुब्रम्हणीया अय्यर नेल्लोर. श्री. ए. बी. रामचंद्रराव अनंतापूर अभिषेक. श्री. के. आर. गुरू मंगलोर. श्री. एस. राजाराम त्रिचनापली अभिषेक. श्री. सी. चक्रवर्ती अयंगार नेलोर. श्री. बी. आदीशेष नेल्लोर अभिषेक. श्री. एन. ननजुंडिया माधवगिरी अभिषेक. श्री. एस. रामभुर्ती अय्यर मद्रास अभिषेक. श्री. टी. एस. दंडापाणी अय्यर मद्रास अभिषेक. श्री. आर. व्ही. नाथन मद्रास अभिषेक. श्री. नागराजराव मद्रास अभिषेक. श्री. एस. सुब्रम्हानिया अय्यर इलुपाकुडी अभिषेक. श्री. एस. गंगापती अय्यर मौलापुर अभिषेक. श्री. बी. जी. एल. नायडू बंगलोर अभिषेक. श्री. एकभक्त (क्ष) अभिषेक. श्री. मनूस्वामी नायडू वकील नंद्याळ अभिषेक. श्री. कृष्णाबाई C/o नारायणराव अलन्वी दिल्ली यानी चार अभिषेक केले. श्री. व्ही. एस. महादेवन् मद्रास यांचे आठ अभिषेक दर सोमवारी व दर शुक्रवारी असे महिनाभर अभिषेक केले. श्री. श्री. रामभाऊ सामंत ऑ. खजिनदार साहेब यानी श्रीस अभिषेक केला. श्री सुंदरराव दि. नवलकर यांनीं श्रीस अभिषेक केले श्री. ओक यानी श्रीस अभिषेक केला. श्री जांगळेकर यांनीं श्रीस अभिषेक केला. श्री. वि. अ. वैद्य अंधेरी श्रीस अभिषेक. श्री. कृष्णमुर्ती अभिषेक. गोपाळसुंदर त्रिचनापळी श्रीस अभिषेक. श्री. एम. मनुस्वामी यानी नैवेद्य श्रीस केला.

## कीर्तनें

या महिन्यात संस्थान गवई यांची दोन कीर्तनें एक मार्गशीर्ष वद्य ११ स व दुसरें पौष शु. ११ स. अशी झाली.

## नवल विशेष

ता. २।१।४०। रोजी श्रीसाईबाबा महाराज यांच्या फोटोची व शाडूमातीच्या पुतळ्याची व पादुकाची मिरवणूक श्री. माधवराव देशपांडे यांचे शिरडी येथील राहत्या घरातून निघून श्री. काकासाहेब दीक्षित यांचे वाड्यांत येऊन आरती मंत्रजागर वगैरे होऊन समाप्त झाली. ही मिरवणूक होण्याचे कारण श्री. माधवराव देशपांडे हे दीक्षित वाड्यांतून आपल्या शिर्डी येथील घरी नुकतेच राहावयास गेले जाताना त्यानी कै. काकासाहेब दीक्षित यानी श्री. बाबांच्या पादुका, फोटो, व श्री. बाबांचा पुतळा असें देवस्थान आपल्या वाड्यात स्वतःस पूजाअर्चा करण्यासाठीं मोठ्या भक्तीनीं स्थापन केलेलें होतें ते वाड्यांतील आपले सर्व सामान नेले त्या बरोबर नेले होते. ही गोष्ट श्रीसमर्थ साईबाबांचे भक्तांना व संस्थानच्या चालकाना बरी वाटली नाहीं. म्हणून त्यांनीं याची मागणी केली, परंतु समर्थांची लीला कांहीं अगाध आहे. मागणी केल्याबरोबर श्री.

माधवराव देशपांडे यानी सर्व देवस्थान जसेच्या तसे परत देणेंचे कबूल केले म्हणून सर्वत्र मंडळीना आनंद होऊन मोठ्या समारंभानिशी श्रीमंत रा. ब. भाऊसाहेब धुमाळ यांनीं स्वतः आपली मोटार घेऊन बँडबाजा ताशेवाजंत्री भजनी दिंडी वगैरे समारंभानिशी श्रीच्या पादुकाची पूजा करून मिरवत दीक्षित वाड्यांत आणून पूर्वी जसे होते तसेच स्थापन करून पूजा आरती नैवेद्य समर्पण केले. या समारंभास संस्थानच्या चालकवर्गापैकी व गावांतील ही बरीच मंडळी हजर होती.

शिर्डी येथील शाळेला संस्थानकडून एक मोठे घड्याळ ता. १।१।४० ला बक्षीस देणेंत आले.

शिर्डी येथील मराठी शाळेस जोडून इंग्रजी तीन इयत्तेपर्यंत शाळा सुरू होण्याबद्दल गांवांतील प्रमुख मंडळी व श्री. बी. व्ही. नरसिंहस्वामीजी मद्रास हल्ली मुक्काम शिर्डी यांचे अध्यक्षतेखाली सभा भरवून विचारविनिमय होऊन शाळेला मदत मिळावी म्हणून विनंती करणेत आली आहे.

श्री. बी. व्ही. नरसिंह स्वामीजी मद्रास यांचा मुक्काम हल्ली शिर्डी येथें असून श्रीविष्णुसहस्रनाम अर्चन म्हणून धर्मकृत्य कसें करावें याबद्दल सविस्तर माहिती शिर्डी येथील ब्राह्मणाना त्यानीं दिली आहे. कारण अशीं अर्चनें करणेविषयीं मद्रास भक्तांकडून वेळोंवेळीं मागण्या येतात.

## हवापाणी

उत्तम आहे.

श्री. ना. खारकर.
ऑ. चिटणीस

---

# माहे फेब्रुवारी सन १९४०

## देणग्या

श्री. एम्. जे. तिरुमलाचार्य सानिटरी इनस्पेक्टर चामराजसागर बेंगलूर यानी गलेफ ( वायाळ ) रंग निळा तांबडी किनार अर्पण केला. श्री. एम्. टी. संपथकुमार श्रीपुरम २ स्ट्रीट रायपढे मद्रास यानी गलेफ ( वायाळ ) रंगपिवळा जांभळी किनार अर्पण केला. श्री. गुरु रामकृष्ण सुब्राय चेटीगारू मु. कविली यानी ( वायाळ ) कापड पांढरे वार २ अर्पण केले.

## धर्मकृत्यें

श्री. दादाजी गोपीनाथ जोशी दादर यांनी मुलाचे मुंजीप्रित्यर्थ श्रीचरणीं लघुरुद्र नैवेद्य ब्राह्मण भोजन असे धर्म कृत्य केलें हस्ते नानू पूजारी. श्री. टी. एन. पेरुमल धुक्का नाइक नपल्यम ( मद्रास ) श्रीचरणीं लघुरुद्राभिषेक केला. श्री. ए. वेणुगोपचारी मैलापूर अभिषेक. श्री जी. सुभरत्नम् अभिषेक. श्री. पी. रामचंद्रन् अभिषेक. श्री. बी. तिरुमलाचार्य प्रोफेसर म्हैसूर कॉलेज अभिषेक. श्री. बळवंत नागेश दातार बेळगांव, श्रीस नैवेद्य ब्राम्हण सुवासिनी अभिषेक. श्री. टी. डोरास्वामी पिलाई, श्रीस अभिषेक. श्री. व्ही. कुपुस्वामी मुदलीयार इरोड अभिषेक. श्री. के. एस. रामस्वामी अभिषेक. श्री. एस. रंगनायळू चेटि अभिषेक. श्री. आर. कलहस्टी अभिषेक. श्री. जी. ट्रेसी अभिषेक. डॉ. बी. संकराव अभिषेक. श्री. आर. वेंकट सुबिया अभिषेक. श्री. वाय हनुमंतराव अभिषेक. श्री. अबाराजा अभिषेक. श्री. जी. व्ही. व्यंकटरमण अभिषेक. श्री. कुमुडी लक्ष्मीदेवी चेटी अभिषेक. श्री. एम्. माली रेड्डी अभिषेक. श्री. के. पालनि आंढि पिलाई अभिषेक. श्री. मरिमुथु अम्मल अभिषेक. श्री. व्ही. वेंकटनारायण अभिषेक. श्री. व्ही. वेंकटनारायण कमलपुरम् अभिषेक. श्री. एम्. ए. वीरावळी अम्मल अभिषेक. श्री. एम्. ए. रुक्मिणी अम्मल अभिषेक. श्री. द्वारकानाथ काशिनाथ देशपांडे विलेपारले अभिषेक. श्री. एन्. नंजुडिया बंगलोर अभिषेक. श्री. कृष्णाबाई C/o बी. नारायणराव ४ अलेन्बीरोड न्यूदिल्ली पांच अभिषेक ( दरगुरुवारी एक प्रमाणें ).

श्री. बळवंत नागेश दातार बेळगांव यानी श्रीस नैवेद्य ब्राह्मण सुवासिनी भोजन केले. श्री. बी. तिरुमलाचार्य प्रोफेसर सो. म्हैसूर यानी श्रीस नैवेद्य, ब्राह्मण सुवासिनी भोजन केले.

या महिन्यात श्री. बी. व्ही. नरसिंहस्वामीजीनी तीन श्रीविष्णू सहस्त्रतुलसी अर्चनें केली.

## नवल विशेष

श्री. बी. एन. नरसिंह स्वामीजी मद्रास यांचा मुक्काम शिर्डीस श्री. मंदिरात असून त्यांनी श्रीच्या नित्य आरतीचे वेळीं नवीन सुधारणा ( वाजंत्री ) बाहेरचे पडवीत वाजविण्याची व्यवस्था केलेली आहे. ( कारण वाजंत्री संबळ यांचे गोंगाटामुळें ) आरतीतले शब्द स्पष्ट समजत नाहींत म्हणून वाजंत्री बाहेर वाजविणेस सांगितले आहे. दुसरे दुपारचे आरतीचे वेळीं आष्टकें म्हणणेचे अगोदर प्रथम ( नारायणं नमस्कृत्य नरंचैव नरोत्तमम् ॥ देवीं सरस्वतीं व्यासं ततो जयमुदीरयेत् ) ( नमः श्रीसाईनाथाय मोहतन्द्रा-

विनाशिने ॥ गुरुवे बुद्धि बोधाय बोधमात्र स्वरूपिणें ) ओं नमो भगवते वासुदेवाय असें म्हणून दररोज भगवद्गीतेचा एक अध्याय म्हणावयाचा व त्यानंतर ( यस्यदेवे पराभक्तिः यथादेवे तथा गुरौ ) ( तस्यैते कथिता ह्यर्थाः प्रकाशन्ते महात्मनः ) समर्थ सद्गुरु साईनाथ महाराज यत्पठिंततत् सर्व मिदं अस्माकं विशर्द भवतु ओं तत्सत साईनाथार्पणमस्तु असे म्हणून नित्य आष्टके सुरू होतात. सात आठ नवीन भगवद्गीतेच्या प्रती पाकेट साइज मुद्दाम या कार्याकरितां आणून दिलेल्या आहेत आणि त्रैळीवेळीं आरती म्हणणारे पुजारी वगैरे नोकर मंडळीस आरती सावकाश स्पष्ट शब्द सर्वांना ऐकू जातील अशा तऱ्हेनें म्हणणेबद्दल सांगितले आहे. आरती आष्टकें स्पष्ट म्हटल्यानें त्या शब्दापासून प्रेम उत्पन्न होते हा त्यात हेतू आहे हे स्वतः त्यांनीं म्हणून दाखविलें आहे.

वरील सुधारणांपैकीं वाजंत्र्याचे बाबतींतलि सुधारणा योग्य आहे. परंतु दुपारचे आरतीचे वेळचा फरक कमिटीचे परवानगीशिवाय अमलांत आणणें योग्य होणार नाही म्हणून तूर्त बंद ठेवणेंविषयीं संस्थान नोकरांस बजाविलें आहे.

## कीर्तन.

ता. २१-२-४० बुधवार रोजीं श्री. वें. शा. सं. कीर्तन केसरी बा. त्रि. मंजुशास्त्री पंढरपूरकर यांनीं श्री मंदिरांत कीर्तनाची हजेरी दिली. बुवांचे बरोबर पंढरपूरचे मृदंग वादनाचार्य शंकर केशव मंगळवेढेकर जोशी यांनीं फारच उत्तम तबला वाजविला. बुवांचे कीर्तन फारच उत्तम झालें. कीर्तनास श्री. रा. ब. भाऊसाहेब धुमाळ व श्री. बुटीसाहेबांचे कारभारी श्री. जोशी साहेब असें हजर होते. शिवाय गांवातील बरीच मंडळी हजर होती.

श्री. हुसेन अब्बास सय्यद मळेगांवकर नांवाचा मुलगा श्री ज्ञानेश्वरीचे पारायण करण्यासाठीं ह. भ. प. दासगणू महाराज यांचे सांगण्यावरून शिर्डीस आलेला आहे. हा मुलगा जातीनें मुसलमान आहे परंतु ह्याची सर्व वागणूक हिंदुप्रमाणेंच आहे. हा मुलगा स्वभावानें गरीब, सालस व सज्जन आहे. ह्यांनीं श्री मंदिरांत माघ शु. ११ चे दिवशीं रात्रौ कीर्तनाची हजेरी दिली. कीर्तन वारकरी पंथाप्रमाणें एक तासभर केलें त्यांनीं ताल सुराची माहिती करून घेतल्यास कीर्तनास रंग चांगला येईल.

संस्थान गवई यांचे पौष वद्य ११ स श्री मंदिरांत कीर्तन झालें.

## हवामान.

उत्तम आहे.

**श्री. ना. खारकर**
ऑ. चिटणीस.

॥ श्री साई प्रसन्न ॥

# श्रीगुरुपौर्णिमा-उत्सव

## श्री साई महाराज शिर्डी यांच्या श्री गुरुपौर्णिमा उत्सवा-प्रीत्यर्थ शके १८६१ (सन १९३९) साली झालेल्या जमाखर्चाचा हिशेब.

### जमे.

३४८- समर्थाचे पेटीतील उत्पन्न

४०१८= रु. वर्गणी भक्त मंडळी कडून आलेली बेमाजी याध्या ७ सात असे.

१२३॥-॥ रु. श्रीमंत केशवराव गोपाळराव बुटी यांचेकडून झालेली सरती

रक्कम. ५५८।॥०।॥

### नावे

२७१॥।- मुदबक खाते

रु. ४८=)॥ बेसन पठि २६॥ शेर, रु. १३॥०॥ तांदुळ बारीक २८॥। पायली रु. १९८-)॥ तांदुळ ठोकळ ५२। पायली, रु. १९ गहू मण दोन, रु. १२॥। तुरीचीडाळ १२ पायली, रु. १॥। मठि तीन पायली, रु. १८८≡ गुळ शेर ८३॥।, १॥ रु. हर-भऱ्याची दाळ २ पायली, ३०॥= रु. साखऱ्या शेर १०० पोत १, ४॥ रु. रवा ३०, शेर, ०॥≡ पीठी साखर शेर २, १८- रु. सुपारी २॥ शेर, ०।≡ रु. लवंग पावभर १८= रु. बदाम १ शेर, ०॥० विलायची छटाक २, ।०॥ आ. शेंगदाणा १॥ शेर, ८-॥ आ. हिंग ३ तोळे; ८= आ. चिकन सुपारी २ छटाक, ८= आ. जीरे पावभर, ८-॥ आ. धणे अर्धा शेर, ८≡ आ. काथ २ छटाक, ।= आ. आमसुल १ शेर, ८०॥ आ. मीरी, ८= आ. खजूर, ८≡॥। आ. नारळ ५, ८≡ खडी साखर अर्धा शेर, ।≡ आ. खोबरे १। शेर,, ८=॥ आ. किसमीस पावभर, ।- आ. मोहरी १ शेर, ८= आ. गुलाल २ छटाक, ६।=॥ रु. करडीचे तेल २४॥ शेर, ८≡॥। आ. कर्णीक १॥ शेर, ४॥।०॥। रु. फराळ खर्च, ८८-। रु. काष्ट, १॥-॥ रु. पीसाई खर्च,

४।≡ रु. शाकभाजी. १८~॥। रु. पानसुपारी, ५१८≡ तुप ३ डबे, ४० रु. आचारी ( स्वयंपाकी ), ९॥≈॥। रु. दुध गाईचे व म्हैशीचे, ॥≡ दही ५॥ पायली, ५॥।≡ रु. पत्राळी व द्रोण, २॥ रु. चहा डबा, २ रु. कसुदी ६ शेर, ।~ आ. चिंच ५ शेर, १ रु. बारीक हळद २ शेर. एकुण २७१॥।~ रु.

१०॥।≡ रोषनाई खर्च.

८≈॥ आ. आगपेटी, १॥ रु. मेंथल नग १२, ९।०॥ रु. घासलेट ३ डबे एकूण १०॥।≡ रु.

४४।०॥। धर्मादाय खर्च.

१५॥।~॥ रु. देवधामी खर्च, १२॥≈ रु. इनाम खर्च, १२ रु. पामरी समाधीवर, ३॥।~ रु. पुजेचे सामान एकूण ४४।०॥।

१०६॥।०। रु. प्रसाद खर्च

६॥। रु. कापड पिवशाबद्दल ३॥ रु. शिलाई ३। रु., ४। रु. साखर १२ शेर, ॥≈ सुंठ १ शेर, ॥।~ आ. रिळदोरा ०॥० रद्दी २ शेर ।~ आ., ३६॥।≡॥ रु. पोष्टेज खर्च, ६॥ रु. छपाई, ५॥। रु. कव्हरें, ५॥।~ रु. लेबले तयार करणें, ३९।०॥ रु. टपाल खर्च. एकूण १०६॥।०।

८२८≈॥। प्रवास खर्च.

६९।≈ रु. रेल्वे खर्च जाणे येणें, ६॥।≈ रु. मोटार खर्च, ॥।≈ आ. टांगा खर्च, २॥।≈॥ रु. हमाली खर्च, २ रु. गाडी भाडें, ८≈। नदी उतारी. एकूण ८२८≈॥। रु.

४२॥≈। रु. किरकोळ खर्च.

१५ रु. ब्यांडबाजा, १॥ रु. तासेवाले, १६॥।०॥। मजुरी खर्च, ३॥।०। रु. भीकार भोजन, ३॥।०। रु. चिल्लर खर्च, १॥। कमिशन मनीआर्डर. एकूण ४२॥≈। रु.

८≈॥। आ. डाकखर्च.

एकूण ९५८॥।०॥। रुपये.

## श्री गुरुपौर्णिमा उत्सवाकडे कराची येथून आ. चिटणीसांकडे आलेली वसुलाची यादी.

| | | |
|---|---|---|
| ०—५—३ | सौ. रमाबाई देवधर | कराची |
| ०—५—३ | सौ. जानकीबाई देवधर | ,, |
| १—४—० | सौ. हिराबाई पम्बू | ,, |
| १—१—० | सौ. नीराबाई पवार | ,, |
| ०—५—३ | सौ. राधाबाई बराडकर | ,, |
| १—४—० | कु. इंदिराबाई तेंडूलकर | ,, |
| १—४—० | रा. चंद्रकांत मालवणकर | ,, |
| १—४—० | रा. द्वारकानाथ पै | ,, |
| १—४—० | रा. शंकर कदम | ,, |
| १—४—० | रा. बी. टी. देसाई | ,, |

९—८—९
११६—०—०
२७५—९—३

४०१—२—० एकंदर वर्गणी.

श्रीसाईबाबा

## वर्गणी श्री. सामंतांकडे आलेली

| | | | |
|---|---|---|---|
| १०—०—० | श्री. | आर. बी. मयेकर | सिंगापूर |
| ५—०—० | ,, | दाजी विठ्ठल सांबारे | पार्ले |
| ०—४—० | ,, | गोविंद शि. कारखानीस | बांद्रे |
| १—०—० | सौ. | सिताबाई राजाराम वालावलकर | दादर |
| २—०—० | रा. मा. | यशवंतराव ज. गाळवणकर | बांद्रे |
| १—४—० | ,, | गोविंद अमृत मुळे | माहीम |
| १०—०—० | ,, | गणेश अनंत कोनकर | वजिरिया |

| | | | |
|---|---|---|---|
| १–४–० | ,, | साईभक्त वासुदेव सिताराम चित्रे, | बांद्रे |
| ५–०–० | ,, | मोरेश्वर नारायण सावे, | मुंबई |
| १–४–० | ,, | दत्तात्रय आनंदराव पितळे, | मुंबई |
| १–४–० | ,, | विनायक आपाजी वैद्य, | अंधेरी |
| १–०–० | ,, | हरीश्चंद्र रामचंद्र मस्त्री, | ,, |
| ०–४–० | ,, | जयराम के. म्हात्रे | उरण, |
| ५–०–० | डॉ. | छोटालाल भु. भट्ट, | बडोदा |
| १–४–० | श्री. | पांडुरंग जयराम मंत्री, | मुंबई |
| ४–०–० | ,, | बा. मा. मानकर व श्रीसोनाबाई जयकर, | बांद्रे |
| ५–०–० | ,, | वामन सांवरशेट केसरकर, | बादा |
| ४–०–० | ,, | नारायण पुंडलीक सुवार, | ,, |
| २–०–० | ,, | आत्माराम ना. शिरसाट, | ,, |
| १–४–० | ,, | गंगाधर नारायण चौबळ, | बांद्रे |
| १–४–० | ,, | गणेश विठ्ठल करंदीकर, | माटुंगा |
| ०–४–० | ,, | चिंतामण आनंदराव चित्रे, | बांद्रे |
| १–४–० | श्री. | जनार्दन आत्माराम देसाई, | माहीम |
| १–०–० | ,, | सदाशीव विश्वनाथ देव, | पौंड |
| २–८–० | कु. | कमल रामचंद्र सामंत, | बांद्रे |
| ५–०–० | श्री. | वासुदेव गणेश कोनकर, बजिरिया पो. | चांदोद |
| २–०–० | ,, | आनंदराव परशराम शेळस, | कांदिवली |
| २–०–० | ,, | श्रीधर कृष्ण भगत, | गेबीवली |
| ५–४–० | ,, | सिताराम नि. चौबळ, | खार |
| ५–४–० | सौ. | पद्मावतीबाई केशव चौबळ, | मुंबई |
| १–०–० | श्री. | एं. जी. तळपदे, | बांद्रे |
| १–४–० | ,, | दाजीसाहेब अवस्थी, | पुणें |
| ५–०–० | ,, | ओछवलाल लाभशंकर, | वजिरीया |
| १–०–० | ,, | ज. रा. दळवी, | बसई |
| ०–४–० | ,, | ल. बा. सोनटक्के, | शीव |

६–४–०

## पुरंदरे मार्फत वसुल

| | | |
|---|---|---|
| १—४—० | श्री. चिंतामण रामनाथ सातघरे, | वांद्रे |
| १—४—० | ,, मुकुंद शामराव जयकर, | ग्रांटरोड |
| ५—०—० | ,, जे. बी. कोठारी, | इंदोर |
| ५—०—० | सौ. पूस पून राजलक्ष्मी देवी, | त्रिचनापली |
| १—०—० | श्री. बी. पूस सुब्रम्हण्यम्, | कोईमतूर |
| १—४—० | श्री. विष्णु बाळकृष्ण साने, | पावलीवसई |
| १४—१२—० | | |

## बाळाजी गुरव मार्फत वसुल

| | | |
|---|---|---|
| १—४—० | कु. कमलबाई गोविंदराव करंजेकर, | पुणें |
| १—४—० | सौ. लक्ष्मीबाई गोविंद गाडगीळ, | पुणें |
| ०—१२—० | ,, बगुताई करंजेकर, | पुणें |
| ०—८—० | ,, हरहिर केशव मेहेंदळे, | पुणें |
| १—४—० | ,, गोविंद काशीनाथ गाडगीळ, | पुणें |
| ५—०—० | | |

## गुरुपौर्णिमा चिटणीस मार्फत वसुल

| | | |
|---|---|---|
| १—४—० | श्री. के. ए. पंथकी, | सांताक्रुझ |
| १—०—० | सौ. किहीमकरीणबाई, | ठाणे |
| २—०—० | श्री. के. ए. जुन्नरकर, | बडोदे |
| १—०—० | श्रीमती पार्वतीबाई गडकरी, | दादर |
| १—०—० | सरदार एस्. सी. मूदलीयार | पुणे |
| ५—०—० | डॉ. एस्. एम्. प्रधान, | अंधेरी |
| २—०—० | श्री. एम्. ए. वेडाम्मल, | मद्रास |
| ३—०—० | श्री. एम्. ए. राधाम्मल, | मद्रास |
| २—०—० | ,, एस्. रुक्मिनीअम्मल, | मद्रास |
| १—०—० | ,, का. रा. आंजलेंकर, | मुंबई |
| २—०—० | ,, वायू. व्यंकटराव, | निदाददोल मद्रास |

| | | |
|---|---|---|
| २—०—० | ,, एस्. बी. मल्लापूर, | मुंबई |
| १—०—० | ,, के. एस्. विठ्ठलराव, | अनंतापूर |
| ५—०—० | रावसाहेब डी. एस्. रामचंद्रअय्यर | नेगापट्टम |
| ५—०—० | श्री. मो. ह. कर्णीक, | डहाणू |
| ४—०—० | ,, गो. मा. विजयकर, | मुंबई |
| २—०—० | ,, ए. आर. मुलकी, | कलकत्ता |
| १—०—० | ,, मो. वि. जोशी, | उंबरगांव |
| ५—०—० | ,, व्ही. व्यंकट नारायण, | कमलापुरम् |
| ३—०—० | ,, भा. वि. करंडे, | मुंबई |
| १—४—० | सौ. व. श्री. ग. पां. कारखानीस, | ठाणे |
| १०—०—० | डॉ. के. व्ही. सावे, | मुंबई |
| २—०—० | श्री. बी. पी. परेलकर, | दादर |
| २—०—० | ,, डी. पी. नायडु, | पुणे |
| २—०—० | ,, डी. आर. शास्त्री, | आरकलगुड |
| १—४—० | डॉ. व्ही. जी. गरुडे, | आलीबाग |
| ०—२—३ | श्री. डी. एम्. कुळकर्णी, | मुंबई |
| २—०—० | श्री. दा. शं. खारकर, | ठाणे |
| ६९—१४—३ | | |
| २—०—० | श्री. वा. प्रा. पटेल | उमरेठ |
| २—०—० | ,, जी. व्ही. आरस | कशोद |
| १—०—० | ,, बी. ओडीसेशाइह, | नेल्लोर |
| १—४—० | ,, एस्. बी. कंटक, | मुंबई |
| १—०—० | ,, एस्. एन्. राईलकर | मुंबई |
| १—०—० | ,, सा. आ. शिरोडकर | कुर्ला |
| १—०—० | ,, ग. मो. सुगवेकर | कुर्ला |
| १—४—० | ,, शां. ब. नाचणे | कुर्ला |
| १—४—० | ,, पां. वि. खवणेकर | कुर्ला |
| ०—८—० | ,, केशव कोंडो फाटक | ठाणे |
| १—०—० | ,, बा. वि. स्वार | मुंबई |
| १—४—० | ,, रा. क. पाटणकर | अलिबाग |

| | | |
|---|---|---|
| २—४—० | सौ. सुंदराबाई पाटकर | बडोद्रे |
| १—४—० | श्री. एम्. जे. महाजनी | मुंबई |
| १—४—० | ,, पा. ना. वैद्य | भुसावळ |
| ३—०—० | श्रीमती काशीबाई कानिटकर | पुणे |
| १—०—० | श्री. पी. एस्. दीक्षित | बांद्रे |
| १—०—० | ,, श्री. गो. साठे | माहीम |
| १—४—० | ,, कृष्णराव रामचंद्र खंडकर | देवास |
| ५—०—० | ,, रावसो बाळाजी बापुजी राणे | खार |
| १—०—० | सौ. प्रेमलाबाई खंडेराव राणे | खार |
| १—४—० | श्री. सु. दि. नवलकर | मुंबई |
| १—४—० | कु. गोरुबाई गजानन विजयकर | मुंबई |
| १—४—० | सौ. सुशिलाबाई वसंतराव गोरक्षकर | सांताक्रुझ |
| १—४—० | कु. सिमंतीनी ,, ,, | ,, |
| १—४—० | कुमार सदाशीव ,, ,, | ,, |
| १—४—० | कु. ताराबाई नारायण गोरक्षकर | ,, |
| १—४—० | ,, सोनाबाई शामराव धुरंधर | विलेपार्ले |
| १—४—० | सौ. नऊबाई शामराव धुरंधर | ,, |
| १११—६—३ | | |
| १—४—० | श्री. रामराव दिनानाथ मदन | मुंबई |
| १—४—० | ,, शेट दोराबजी डी. ताडीवाला | मुंबई |
| ५—०—० | ,, टी. बालनगी रेड्डी | अनंतापूर |
| ५—०—० | ,, भाऊ आबाजी वैद्य | दादर |
| १—०—० | ,, के. एस्. मनी | कोईमतूर |
| १—०—० | सौ. सावित्री अम्मल | ,, |
| १—०—० | ,, पार्वती अम्मल | ,, |
| १—४—० | ,, सोनाबाई नाडकर | माहीम |
| २५—०—० | संजीवाप्पा आणि सन्स | अडोनी |
| २—०—० | श्रीमती दुर्गाबाई देशवंडीकर | जळगांव |
| १—०—० | श्री. मोहनीराज सखाराम महाजन | संगमनेर |
| ५—०—० | ,, मारुती भिकाजी पंडीत | तुरंबव |

| | | |
|---|---|---|
| २—०—० | ,, जीवरावराव कल्याण शुक्ल | उंबरगांव |
| १५—०—० | श्रीमंत छोटे मासाहेब, देवास | ज्युनिअर |
| | ( शिवाय धर्मकृत्याचे रु. १० ) | |
| १५—०—० | श्री. डी. एन्. गुरुजी, | हैसाण |
| ५—०—० | ,, डी. एन्. पल्ळकर, | दामोह |
| ४—०—० | ,, ब. रा. चोणकर; | बोरिवली |
| ३—०—० | ,, के. के. खाजगीवाले, | पुणे |
| ५—०—० | ,, व्ही. स्वामीनाथ अय्यर, | मद्रास |
| ५—०—० | ,, के. शंकर नारायण | मुल्लाकल |
| २—०—० | ,, पी. श्रीराम, | तेनाली |
| ९—०—० | ,, जी. पी. देसाई | रंगून |
| ५—०—० | ,, के. अनंतारमण, | मद्रास |
| १—०—० | ,, व्ही. जो. लागू | सांगली |
| १—४—० | ,, रा. ल. मेकडे, | तळे |
| ३—०—० | ,, एम्. टी. नरसिंहयम, | कुडाप्पा |
| २—०—० | सौ. गोपिकाबाई चित्रे | ठाणे |
| १—०—० | श्री. बा. पु. देसाई | ठाणे |
| १—०—० | ,, र. द. रेगे | कुडाळ |
| २४०—६—३ | | |
| ३—०—० | श्री. रामचंद्र आ. दोंदे, | कराची |
| १—४—० | ,, नारायण बाळकृष्ण पोरे, | चौल |
| १—०—० | ,, सुं. बा. शेलार, | रेवदंडा |
| १—४—० | श्रीमती पारुबाई गणपत तलावकर, | खोन्चिवडे |
| १—०—० | ,, श्री. बी. एन्. विश्वमंदल | मद्रास |
| १—०—० | सौ. व्यंकटेश लक्ष. अम्मा रौजी, | ,, |
| १—०—० | श्री. एकला कृष्णीया चेट्टी, | ,, |
| १—०—० | ,, मराकथल. अम्मा | ,, |
| १—०—० | रावसा. बी. पी. चेट्टी, | ,, |
| १—०—० | श्री. पी. ए. एयम्मा चेट्टी, | ,, |
| १—०—० | ,, जी. व्ही. राधाकृष्णन, | ,, |

| | | |
|---|---|---|
| ०—९—० | ,, आर. धरमिया, | कुली ताले |
| २—०—० | ,, के. वाय्. प्रधान | पालनपूर |
| ९—९—० | मेसर्स द्वारकानाथ आणि कंपनी | मद्रास |
| २६६—४—३ | | |
| १—४—० | सौ. शांताबाई खंडेराव नवलकर | अंधेरी |
| १—४—० | ,, लक्ष्मीबाई मुकुंद पाटील | ,, |
| १—४—० | ,, सुभद्राबाई पांडुरंग म्हात्रे | ,, |
| १—०—० | श्री. वि. के. संत | निरापूर |
| २—०—० | ,, वि. स. मिराशी | इचलकरंजी |
| २—०—० | ,, वि. गो. देव | संगमनेर |
| १—१—० | ,, गो. भा. दातार | ठाणे |
| ०—४—० | सौ. सुशिलाबाई गो. दातार | ठाणे |
| ०—४—० | श्रीमती सरस्वतीबाई पाठक | ठाणे |
| २७५—९—३ | | |

१२८

## भिवपुरीरोड श्रीसद्गुरू साईबाबांच्या देवळांतील शेरे बुकांतील

# नक्कल

श्रीसाईबाबा प्रसन्न

श्रीनें मजला या आपले स्थानास खेचून आणणेचा सुयोग घडऊन आणून आपलें सर्वव्यापकतेबद्दल एक अलभ्य लाभ दिला व येथें येऊन मनास काय वाटलें तें प्रदर्शित करणेस मी अगदीं असमर्थ आहे. फक्त श्रीचे या ठिकाणीं खेचून आणून देऊन या संस्थेच्या चालकांस त्यांचे सेवेचे फळ म्हणून भक्तांचा सारखा ओढा या स्थानाकडे लागून त्यांचे बाल्यावस्थेंत असलेले कार्यास प्रौढावस्थेस नेणेस श्री कधींही कमतरता पडूं देणार नाहीं अशी श्रीचे चरणीं अनन्यभावें प्रार्थना करितों.

श्रीचें स्थान फारच रम्य व दुर्मिळ असें सुयोजित ठिकाणीं आहे व बाबांनीं कै. प्रधान यांना दिलेले आशिर्वादाप्रमाणें बाबांनीं आपलें वास्तव्य या ठिकाणीं केलेलें आहे हें प्रत्येक भक्तांस अनुभवानें पटेलच. व अशा स्थानाचा महिमा वाढून आपले सद्गुरूची किर्ती वाढविणे हीच सद्भक्ताची सद्गुरूची सेवा या तत्वानुरुप या बाबांचे मंदिराचे जिर्णोद्धार वगैरे कार्यास यथाशक्ती हातभार लावणेस भक्तास बाबा प्रेरणा देतीलच.

प्रथम भेटीस जास्त उद्गार नकोत असें वाटून येथेंच लिखाण बंद करून बाबांचे रामजयंती उत्सवास [१८६२] फुलना फुलाची पाकळी रूपी देणगी देऊन श्रीची रजा घेतों. ता. २५।३।४० सोमवार.

श्रीधर नारायण खारकर
ऑ. चि. शि. सं.

श्रीदत्तचित्साईसद्‌गुरुभ्योनमः

# पुण्यतिथि

श्रीक्षेत्र शैलधी ( शिरडी ) येथील श्री समर्थ सद्‌गुरु साईबाबामहाराज यांच्या शके १८६१ सालच्या पुण्यतिथ्युत्सवाचा वृत्तांत, जमाखर्च व उत्सव कार्यासाठीं ठिक-ठिकाणाहून वर्गणी पाठविणाऱ्या सद्‌भक्त संघाची वर्णानुक्रम

## नांवनिशीवार व रकमवार यादी

वरील श्रीच्या पवित्र पुण्यतिथि उत्सवाच्या तयारीकरतां वांद्र्याहून श्री. र. भा. पुरंदरे व ठाण्याहून श्री. बा. वि. देव सहकुटुंब अगाऊ ता. १५–१०–३९ रोजीं शिरडीस गेले; एकदोन दिवसानंतर श्री. सिताराम पोवार हेही पुण्याहून नेहमीचे सामानासह शिरडीस आले. उत्सवास प्रारंभ विजयादशमी ता. २२–१०–३९ रविवार पासून झाला.

## बाहेरगांवाहून आलेली भक्त मंडळी

श्री. खारकर श्री. ना., प्र. सचिव शि. सं. ठाणें
,, धुमाळ स. ब. रा. ब. विश्वस्त ॲडव्होकेट, नाशिक
,, प्रधान मो. वि. रा. ब. हा. को. वकील, ओ. सी. विश्वस्त सांताक्रूझ
,, गोरक्षकर वसंतराव नारायण, विश्वस्त शिरडी
,, सामंत रा. रा. प्र. कोषाध्यक्ष शि. सं. वांद्रे
,, पुरंदरे र. भा. प्रशस्य मदत सचीव, ,,
,, देव बा. वि. विश्वस्त शि. सं., ठाणें
सौ. जानकीबाई बाळकृष्ण ,,
कु. मीनाक्षी श्रीनिवास ,,
श्री. श्रीपाद बाळकृष्ण वकील ,,
सौ. उमाबाई श्रीपाद ठाणें
श्री. मधुकर [जगन्नाथ] चिंतामण ,,
,, गाडगीळ गो. का., बॅरिस्टर आपासाहेब पुणें
सौ. लक्ष्मीबाई वहिनीसाहेब ,,
श्री. मुळे वहिनीसाहेबाबरोबरचे गृहस्थ ,,
,, पवार सिताराम, सौ. गाडगीळ साहेबांतर्फेचा ,,
,, गाडगीळ साहेबांच्या शेतावरील मंडळी मांजरी
,, दारूवाला बॅरिस्टर मुंबई
,, सावंत नागेश आत्माराम, इन्स्पेक्टर ट्रेनिंग क्लास, मुलाबाळासह नायगांव
सौ. इंदिराबाई नागेश ,,
,, काशीबाई कृष्णाजी ,,

श्री. डॉ. सावे मुंबई
,, पाटील सखाराम रावजी सांताक्रूझ
,, नेमन लक्ष्मण महादेव ,,
,, ठक्कर डॉ. के. आर. बॅनकोला ,,
,, मुरझेलो के. ,,
,, नवलकर सुंदरराव दीनानाथ मुंबई
,, जोशी आत्माराम नथोबा दादर
,, देव विष्णू गोविंद संगमनेर
,, खेर गंगूबाई पुणें
,, धामणकर भागूभावशी भिवंडी
,, दिनशा पारशी बंधूसह मुंबई
,, क्षत्रिय भिकुसा यम्मासा नाशिक
,, अहिल्याबाई किसनबाई पुणें
श्री. महाजन महादेव जिवाजी मुंबई
,, कानिटकर काशीबाई व त्यांचे बरोबर आलेल्या दोन शेजारणी पुणें
,, बाबूराव नाशिक

श्री. सहस्रबुद्धे सुमारे २५ मंडळीसह मॅनेजर महाराष्ट्र शुगर वर्क्स् बेलापूर
,, सहस्रबुद्धे माधवराव विष्णु इंजिनिअर, फलटण
,, पाटणकर, सबरजिस्टर बारामती
,, ,, मंडळीसह कोपरगांव
,, कोलाहल सुभद्राबाई दक्षिण हैद्राबाद
,, चांदोरकर शारदाबाई इंदोर
,, औटी तात्याजी संवत्सर
,, जोशी गोपाळ धोंडदेव ,,
,, ,, रघुनाथ गोविंद कोऱ्हाळे
,, ,, दत्तात्रय विष्णु ,,
,, लक्ष्मीकांत त्रिंबक कोकमठाण
,, मुळे नारायण लक्ष्मण ,,
,, भागवत म्हाळसाकांत निमगांव
,, निमकर हरी जनार्दन मुंबई
,, ,, विष्णु आपाजी ,,
,, बीरकर नरहर भार्गव ,,

## भिक्षा

प्रतिवर्षाप्रमाणें या वर्षींही श्री. पुरंदरे, देव, मराठे इतर सद्भक्त, संस्थान नोकर मंडळी यांनीं रविवारीं व सोमवारीं सकाळीं मृदंग, टाळ, चिपळ्या, झांजा वगैरे वाद्यांच्या व बाबांच्या पुण्य नामघोष गजरांत परमानंदानें गांवांत भिक्षा मागितली.

## सरस्वतीपूजन

"श्री. लक्ष्मीदामोदर बावरे चिंचणकर" वाचनालयांत या वर्षींही दसऱ्याचे दिवशीं सकाळीं सशास्त्र वाद्य गजरांत शस्त्रपूजन व सरस्वतीपूजन मोठ्या थाटानें झालें. ६०-७५ मंडळी जमली होती. सर्वांस तीर्थप्रसाद वाटण्यांत आला.

## कीर्तन व पुराण

या उत्सवांत शिरडी संस्थानचे गवई व कीर्तनकार श्री. विठ्ठलराव मराठे यांचीं ३ व श्री. देव यांची २ अशी ५ कीर्तनें झाली. शिवाय श्री. मराठे यांचे कोजागरी पौर्णिमेच्या दिवशीं रात्रींही एक कीर्तन झाले. तसेच श्री. देव आल्यापासून परत जाई

पर्यंत ३-४ दिवस खेरीज करून [आजारी असल्यामुळें] सर्व दिवशीं श्रीचे मंदिरांत श्रीचरणाजवळ त्यांचें श्री ज्ञानेश्वरी वाचन नित्य चालू होतें.

## कोजागरी

कोजागरी पौर्णिमा या वर्षींहि प्रतिवर्षाप्रमाणें शुक्रवारीं श्रीचे मंदिरांत थाटानें पार पडली. सकाळपासून सायंकाळपर्यंत कार्यक्रम नेहमींप्रमाणें होऊन रात्रौ सुमारे १० वाजल्यापासून श्री. देव यांची १२ वाजेपर्यंत श्रीचे पुण्यसमाधिची व पवित्र पादुकांची पूजा, अभिषेक व तुलसीदत्तसहस्रनाम चाललें होतें. याच १ तासाचे अवधींत श्रीचे समाधिपुढें श्री. मराठे यांचे सुश्राव्य कीर्तन चालू होते. हें सर्व आटोपल्यानंतर श्रीस फलोदक, नारीकेलफलगर्भखंड, पेढे, खडीसाखर, पोहे, शर्करामिश्रित उष्ण दुग्ध या सर्वांचा नैवेद्य समर्पण करून, तमिस्राकांताची पूजा वरील पदार्थांचा नैवेद्यासह मंदिरासमोरील भव्य पटांगणांत करून श्रीची शेजारती झाल्यावर श्रीस मंत्रपुष्प समर्पण केलें नंतर श्री. देव यांनीं जमलेल्या भक्तजनसमुदास कोजागरी कथा वाचून दाखवून सर्वांस तीर्थप्रसाद देऊन भूयसी वाटली. नंतर सर्व मंडळी मंदिरासमोरील भव्य देदीप्यमान विस्तीर्ण व अत्यानंदकारक सभामंडपाचे पटांगणांत रात्रौ ३ वाजेपर्यंत सारीपाट-अक्ष-क्रीडन-सोंगट्या खेळून आपापल्या शयनस्थानीं गेलीं. याच दिवशीं दुपारचे भोजन बाबांच्या बागेंत झालें. थाट अपूर्व होता. स्वयंपाकास रुचिहि अपूर्व आली होती.

## नवान्न पौर्णिमा

श्री. पुरंदरे दादांच्या घरच्या नव्या भाताच्या तांदळाची खीर, भात, पोळी, तूपसाखरेचा श्रीस नैवेद्य शनिवारीं केला.

## भोजनाचा बेत, व भोजन पात्रें.

यंदा भोजनाचा बेत गेले वर्षाप्रमाणेंच होता. भोजन पात्रें आजमासें २५०० चे वर झाली.

## आराधना विधि व अभिषेक

वरील विधी दरवर्षाप्रमाणें वे. मू. मोने भटजींनीं यथाशास्त्र पार पाडला. अभिषेक ५७ झाले.

## तपोवन-बाबांची बाग

रा. ब. प्रधान यांची पुण्यसेवा. भक्तांचें सुदैव. ज्ञान वैराग्याचा लाभ घेणाऱ्या मुमुक्षींची उत्तम सोय. मुनी, तपी, व्रती, जपी, योगी, अनुष्ठानी, यांना एकांत स्थान. राव बहादुरांचे जितके आभार मानावे तितके थोडेचे. बागेचें नाव किंवा तिचें अवलोकन म्हणजे रावबहादुरांच्या सर्व परिवारासह त्यांचें पुण्य स्मरण, व मानसिक स्मितमुख दर्शन.

## औदार्य

श्री. सौ. लक्ष्मीबाईसाहेब गाडगीळ, पुणें, यांनीं भंडारभोजनाकरतां रु. १५ देऊन नेहमी प्रमाणें आपलें औदार्य या वर्षींही प्रकट केलें. तसेंच रु. १७ व रु. १० अनुक्रमें श्रीमती काशीबाई कानिटकर, पुणें व श्री. श्रीधर नारायण उर्फ नानासाहेब खारकर, ठाणें यांनीं वरील भंडारभोजनास मदत म्हणून देऊन आपलें औदार्य प्रकट केलें याबद्दल शि. संस्थान या भक्त त्रयांचे फार आभारी आहे.

## श्री संत भाऊराव कुंभार

या उत्सवांत या पुण्य सत्पुरुषांचें स्मरण पदोपदीं होत असे. भाऊराव म्हणजे कडकडीत खऱ्या वैराग्याची व अप्रतिम अपरिग्रहाची मूर्तीच होती. बाबांनीं त्यांना आपल्या तपोवनाजवळच समाधिरूपानें चिरस्मरणीय करून ठेविले आहे.

## वस्त्रप्रसाद

प्रतिवर्षांप्रमाणें या उत्सवांत, सर्व संस्थान नोकर मंडळीस, चोपदार, तासेवालें, पालखीवाले, अबदागिरवाला, सुतार, अनाथ, अंध, पंगू, श्रांत निराश्रित वगैरे एकंदर ४० लोकांस श्रींचा प्रसाद व देणगी म्हणून ४०—४५ रुपयांचें कापड व कपडे वाटण्यांत आलें.

## जमाखर्च

सोबत ज्या भक्तवृंदाकडून या उत्सवाप्रीत्यर्थ वर्गणी आली त्यांची वर्णानुक्रम नांवनिशी व रकमवार यादी व जमाखर्चाची यादी अशा दोन याद्या जोडल्या आहेत.

## याचना व प्रार्थना

अनुष्टुभ्वृत्तम्.

बालेन बालभावेन । अस्मिन्दिव्य महोत्सवे ।<br>
कृतान्दोषान्क्षमस्वेति । याचे दत्तगुरो सदा ॥

आर्या

भ्रमलें[1], भ्रमलें, मन, भवि, गमलें, नेमलें गुरुरूपे विमैलें ॥<br>
कमलें, वमुदें भवसुख, रमुदे सेवेंत चिर अशा विमैले ॥

ठाणें गुरुवार शके १८६१<br>
मार्गशीर्ष शु. १०<br>
दिनांक २९-१२-३९

श्रीचरणसरोजधूलि दासानुदास<br>
बाळकृष्ण विश्वनाथ देव<br>
शि. सं. पुण्यतिथ्युत्सव, व्यवस्थापक, विश्वस्त.

---

१ वांकून गेलें. २ नानाप्रकारच्या दोषांनी, पातकांनीं, अपराधांनीं. ३ वि=नाहीं. मल=दोष, पातक.

१३१

श्रीदत्तचित्साइसद्गुरुभ्योनमः

## शके १८६१ सालच्या श्री क्षेत्र शैलधी (शिरडी) येथील श्री समर्थ सद्गुरु साईबाबा महाराज यांच्या पुण्य व मंगल

# पुण्यतिथि

## उत्सवाच्या जमा खर्चाचा हिशोब

जमा.

८७२—७—३ श्री उत्सव कार्यासाठी ठिकठिकाणाहून आलेली वर्गणी

- १६२—४—० श्री. सामंतमार्फत
- ४३५—११—३ श्री. खारकरमार्फत
- १७६—१५—६ श्री. देवमार्फत
- ९७—८—६ श्री. घैसास मार्फत

८७२—७—३

२०—९—६ श्री भिक्षेचें उत्पन्न.

३५—११—३ श्री मंदीर व श्री द्वारकामाई पेट्यातील ५ दिवसांचें उत्पन्न.

३७—१—२ श्री शिलकी सामान विक्रिचें उत्पन्न.

१०—०—० श्री कोजागरी खर्चासाठीं दरसालप्रमाणें शिरडी संस्थानातून मंजुर झालेली रक्कम.

९७५—१३—३

खर्च

- ३५१—०—० भोजन खर्च, चहा, काफी, दूध वगैरे
- ४४—१२—३ पूजा, अभिषेक, नैवेद्य, दक्षिणा वगैरे.
- १६—७—० आराधनाविधि खर्च.
- ८८—२—० आचारी खर्च.
- ३—१०—० संस्थानातून खर्च झालेल्या सामानाची किंमत.
- १२—०—० श्री. सामंत यांनीं विकत आणिलेलें सामान.
- ९—१५—० दिवाबत्ती खर्च.
- २०—८—० मजुरी.
- ३८—६—० कापड वाटलें त्याची किंमत.
- २—४—० शिलाई.
- ३७—१३—० प्रवास खर्च, रेल्वे, टांगा, मोटार, बैलगाड्या, हमाली.
- १७—०—० सर्पण.
- ३—०—० बँड.
- १५—०—० बाबांच्या बागेंतून सामान घेतलें त्याची किंमत.
- ५—०—० बाबांच्या गायांना चारा व दाणा.

११०

खर्च

| | |
|---|---|
| ३—८—० | भंगी. |
| २६—७—० | देणगी, पोस्त, व वर्गणी वगैरे. |
| ६०—०—० | निमंत्रणपत्रिका खर्च |
| ५२—१५—६ | प्रसाद, पिशव्या, पोस्टेच खर्च. |
| ०—१०—९ | किरकोळ. |
| ८१८—६—६ | |
| १५७—६—९ | शिल्लक. |
| ९७५—१३—३ | एकुण बेरीज |

श्रीसाईनाथ

# शके १८६१ च्या पुण्यतिथि उत्सवा प्रीत्यर्थ वर्गणी देणाऱ्या सद्भक्तांची वर्णानुक्रम नावनिसिवार व रकमावार यादी

| नांव | रक्कम |
|---|---|
| **अ.** | |
| श्री. अजरेकर डॉ. एस. एस. बेळगांव | ५—०—० |
| ,, अढिया त्रिभुवन नरोत्तम डहाणू | ५—४—० |
| ,, अम्माल के. अमीनी मद्रास Ammal K. Amini Madras Rs. 2 | २—०—० |
| ,, अलरकर सौ. अनुबाई बेळगांव | २—०—० |
| ,, अंजलेकर का. स. मुंबई | १—०—० |
| **आ.** | |
| श्री. कु. आम्रे विमल ह. मुंबई | १—०—० |
| ,, ,, अरुण रामचंद्र | १—०—० |
| ,, ,, बाळाबाई रामचंद्र | १—०—० |
| श्री. आगरकर धोंडो महादेव | १०—०—० |
| ,, आयंगार दुरइस्वामी वेल्लोर Ayangar Duraiswami Vellor Rs. 2 | २—०—० |
| ,, आयंगार चक्रवर्ती सी. वेल्लोर Ayangar Chakravarti c. Vellor Rs. 2 | २—०—० |
| ,, आयंगार एम्. ए. श्रीनिवास त्रिपलीकेन | ४—४—० |

| नांव | रक्कम |
|---|---|
| Ayangar M. A. Shrinivas Trepalikan | 4-4-0 |
| ,, आरस गोपाळ विठ्ठल कन्तोद | २—०—० |
| ,, आरोळकर आत्माराम ल. माहीम मुंबई. | १—४—० |
| ,, आयर व्ही. स्वामीनाथ मद्रास ,, Ayar V. Swaminath Madras Rs. 3 | ३—०—० |
| ,, आयर एम्. आर गोपाळकृष्ण उटकमंड ,,Aiyar M. R. Gopal krishna Utakmand | १—०—० |
| ,, आयर रा. सा. T. S. रामचंद्र वल्लीपल्ल यमतेगा पट्टण. ,,Aiyar R. S. T. S. Ramachandra | ३—०—० |
| **इ.** | |
| श्री. इराणी आरदेसर एन्. मुंबई. | ५—०—० |
| श्री. ईश्वर करसन वझीरिया | १—०—० |
| **उ.** | |
| श्री. उपासनी आर. बी. धुळे. | १—०—० |
| | ५२—१२—० |
| **ओ** | |
| श्री. ओक दत्तात्रय सीताराम नाशिक. | १०—०—० |